सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

शुद्धीपत्रक

विषय :- विद्यापीठ निधीतील 'संचालक, आंतरराष्ट्रीय केंद्र' या पदाच्या जाहिरातीबाबत.

संदर्भ :- जाहिरात क्र.२३, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२६

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यापीठ निधीतून 'संचालक, आंतरराष्ट्रीय केंद्र' या पदाच्या भरतीकरिता जाहिरात क्र. २३, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२६ रोजी विविध वर्तमानपत्रांमध्ये आणि विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.
- सदर जाहिरातीत शैक्षणिक अर्हता व अनुभव याबाबत खाली नमूद केल्याप्रमाणे नोंद घेण्यात यावी.
  "The qualification and experience for the post of Director, International Centre shall be that of the Professor in relevant discipline having aggregate minimum teaching or research experience of **not less than fifteen years**" **या ऐवजी** "The qualification and experience for the post of Director, International Centre shall be that of the Professor in relevant discipline having aggregate minimum teaching or research experience of **not less than Ten years**" असे वाचावे.
- शैक्षणिक अर्हतामधील मुद्दा क्रमांक **A – ii)** मधील "A minimum of fifteen years of teaching experience" **या ऐवजी** "A minimum of **Ten years'** of teaching experience" असे वाचावे.
- तसेच शैक्षणिक अर्हतामधील मुद्दा क्रमांक **B** मधील "supported by documentary evidence provided he/she has fifteen years' experience **या ऐवजी** "supported by documentary evidence provided he/she has **Ten years'** experience" असे वाचावे.
- सदर जाहिरातीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची मुदत मंगळवार, दि. ०३/११/२०२६ ते मंगळवार, दि. १७/११/२०२६ तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज केलेल्या उमेदवारांना अर्जांची प्रत व संबंधित कागदपत्रे प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे सादर करण्यासाठी मुदत सोमवार, दि. २३/११/२०२६ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत देण्यात आलेली होती.
- उपरोक्त 'संचालक, आंतरराष्ट्रीय केंद्र' या पदासाठी ऑनलाईन पध्दतीने सुधारित अर्ज सादर करण्याची व A.T.R. (Academic Teaching Research) विषयक माहिती अद्ययावत करण्याची तसेच ऑनलाईन पध्दतीने नव्याने अर्ज सादर करण्यास **मंगळवार, दिनांक २४/११/२०२६** पर्यंत **मुदतवाढ** देण्यात येत आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज केलेल्या उमेदवारांना अर्जांची प्रत व संबंधित कागदपत्रे प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे सादर करण्यासाठी मुदत **मंगळवार, दिनांक ०१/१२/२०२६** सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत देण्यात येत आहे.
- **या अनुषंगाने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील नमूद जाहिरात क्र.२३, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२६ ला अनुसरुन ज्या उमेदवारांनी विहित मुदतीत अर्ज सादर केलेले आहेत, अशा सर्व उमेदवारांनी त्यांच्या अर्जामध्ये ऑनलाईन पध्दतीने बदल/सुधारणा कराव्यात व A.T.R. (Academic Teaching Research) बाबतची माहिती अद्ययावत करुन विहित मुदतीमध्ये सादर करावेत तसेच ज्या उमेदवारांनी यापूर्वी सदर पदाकरिता अर्ज केला नसेल, अशा इच्छुक उमेदवारांनी विहित प्रक्रियेनुसार अर्ज विहित मुदतीत सादर करावेत.**
- जाहिरात क्र.२३, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२६ व सदरचे शुद्धीपत्रक विद्यापीठाच्या **http://admin.unipune.ac.in/recruitment** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

गणेशखिंड, पुणे-४११ ००७.
जावक क्र.एएन/ 4110
दिनांक : 12 NOV 2026

(प्रा. (डॉ.) प्रफुल्ल पवार)
प्रभारी कुलसचिव